विषय :-नाला गटरातील गाळ काढणे या लेखाशिर्षामध्ये तरतुदीचे पुर्नवियोजन करणेकामी प्रशासकीय मान्यता मिळणे बाबत.

प्रस्ताव

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ६३,६६,६७ (क),९०,३१९ कलम अन्वये जनतेच्या सेवेसाठी किंवा सुरक्षिततेसाठी मा.स्थायी समितीच्या मान्यतेने भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रात विविध ठिकाणी विकास कामे करण्यासाठी आर्थिक तरतूद करणे हे मा.आयूक्त सो यांचे अधिकार आहेत त्याच प्रमाणे या अधिनियमाच्या कलम ९५ व ९६ प्रमाणे दर वर्षी उत्पन्न व खर्च यांचे अंदाजपत्रक तयार केले जातात. त्याप्रमाणे सन २०२२-२०२३ या आर्थीक वर्षात उत्पन्न व खर्च करण्यासाठी लेखाशिर्ष निहाय तसेच बाब निहाय आर्थीक तरतूद करण्यात आली होती. या तरतूदीमधून आतापर्यंत खर्च करण्यांत आलेला आहे. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे नमूद आहे.

| अ.क्रं | लेखाशिर्षाचे नांव | सन २०२२-२३ करिता करीता करणेत आलेली तरतुद | सन २०२२-२३ मध्ये झालेला प्रत्यक्ष खर्च | शिल्लक | पुर्नवियोजन |
|---|---|---|---|---|---|
| १ | नाला गटारातील गाळ काढणे | २००.०० लक्ष | २००.०० लक्ष | निरंक | उपलब्ध |

सन २०२२-२३ या वित्तीय वर्षात जो अर्थसंकल्प मंजूर झाला त्या अर्थसंकल्पामध्ये नाला गटारातील गाळ काढणे, या लेखाशिर्षकामध्ये कामाच्या सोयीच्या दृष्टीने आयुक्त सो. यांनी मान्यता दिलेली आहे. वर तक्त्यात नमूद काम निधी अभावी प्रलंबित आहेत. सदर लेखा शिर्षकामध्ये पुर्नविनियोजन करावयाचे आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम १०२ कलम १०३ व कलम १०४ अन्वये एखादया लेखाशिर्षामधील रक्कम खर्च झाली नसेल तर या नियमाच्या आधारे अनुदानाच्या तुलनेत जादा होणारा खर्च बचतीच्या रक्कमांचा उपयोग करुन भागवीता येवू शकतो व असे पुर्नविनियोजन करण्याचे अधिकार मा.आयुक्त सो. यांना आहेत.

बांधकाम विभाग़ाकडील अग्निशमन केंद्र बांधणे,या लेखाशिर्षा खाली सन २०२२-२३ या अर्थिक वर्षात १००.०० लक्ष ठेवण्यात आले आहेत त्यापैकी सदर लेखाशिर्षामध्ये खर्च झालेला नाही त्यामुळे रु.१००.०० लक्ष रक्कम अखर्चीत आहे त्यापैकी नाला गटारातील गाळ काढणे लेखाशिर्षकात रु.३५ लक्ष या लेखाशिर्षात पुर्नविनियोजन करणेकरीता आरोग्य व स्वच्छता विभाग़ाकडून प्रस्तावित करण्यात येत आहे.

प्रशासकीय ठराव क्रं. 60 दिनांक 09 / 12/२०२२

मा.स्थायी समिती व मा.महासभा अस्तित्वात नसल्याने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषतः कलम ४५२(अ) च्या(१ ब) नुसार बांधकाम विभाग़ाकडील अग्निशमन केंद्र बांधणे,या लेखाशिर्षा खाली सन २०२२-२३ या अर्थिक वर्षात १००.०० लक्ष ठेवण्यात आले आहेत त्यापैकी सदर लेखाशिर्षामध्ये खर्च झालेला नाही त्यामुळे रु.१००.०० लक्ष रक्कम अखर्चीत असून त्यापैकी नाला गटारातील गाळ काढणे या लेखाशिर्षकात रु.३५ लक्ष निधी पुर्नविनियोजन करणे कामी मान्यता देण्यात येत आहे.

प्रशासक तथा आयुक्त
भिवंडी नि.शहर महानगरपालिका